MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १५ अंक : २ पाने : ८ • फेब्रुवारी-मार्च २०२१ • E-Magazine visit us on : www.mahatransco.in

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

सद्यस्थितीत आपली पारेषणप्रणाली सतत कार्यरत ठेवण्याच्या कामांपेक्षा रूपांतरण (Transformation) करण्याचे काम मोठ्या प्रमाणात करावे लागत आहे. आपणा सर्वांना माहित आहे की, देशात इतर कोणत्याही राज्यांपेक्षा आपल्या महाराष्ट्रात विजेच्या पायाभूत सुविधांचे जाळे अधिक व्यापक असून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आपण पोहोचत आहोत. या पायाभूत सुविधांची व्याप्ती विचारात घेतल्यास ही संपूर्ण यंत्रणा योग्यरित्या कार्यरत ठेवणे, आपण तिची देखभाल करणे आणि त्यासोबत विविध कामांचे प्रकल्प उभारणे व चालविणे ही कामे खूप आव्हानात्मक आहेत.

आता ऊर्जाक्षेत्र हा देशाच्या आर्थिक, सामाजिक प्रगतीचा कणा आहे. खरे तर वीज प्रगतीचे वाहक आहे. सर्व चित्र बदलून टाकण्याचे सामर्थ्य आपण करीत असलेल्या वीजपुरवठ्यामध्ये आहे. देशात तंत्रज्ञानाने मोठी झेप घेतली आहे, आणि त्याच्या

- **भविष्यात विजेची मागणी वाढणार**
- **यंत्रणेचे सक्षमीकरण गरजेचे**
- **कर्मचारी रचनेचे काम प्रगतिपथावर**
- **सांघिक भावनेने काम करा**

वापराच्या केंद्रस्थानी वीज आहे. आता तेल व वायू क्षेत्र तसेच माहिती तंत्रज्ञान (आय.टी.)/आय.टी.ई.एस आदी क्षेत्रांत इतकी प्रचंड क्रांती झाली आहे की ती आता विजेच्या आधारेच चालतात, हे आपण अनुभवतो आहोत. इतर क्षेत्रातसुध्दा वीज ही अत्यावश्यक झाली आहे. थोडक्यात, वीज ही हवेप्रमाणे आवश्यक बाब झाली आहे. आज सर्वांचे जीवन विजेवरच अवलंबून आहे. त्यामुळे विजेला यापूर्वी कधी नव्हे इतके महत्त्व आजच्या आधुनिक युगात मिळाले आहे.

यासाठी वीज क्षेत्रात काम करणारे अभियंते आणि वीजतंत्रज्ञ यांचेवर राष्ट्राच्या उभारणीत आणि आर्थिक प्रगतीत मोठा वाटा उचलण्याची जबाबदारी आहे. भारताच्या आर्थिक सर्वेक्षणातून असे स्पष्ट झाले आहे की, देशातील विजेची मागणी ही प्रचंड वाढणार आहे. त्यामुळे ही मोठी मागणी पूर्ण करण्यासाठी आपल्या पायाभूत रचना सक्षम ठेवण्याची गरज आहे, म्हणून विजक्षेत्राच्या तिन्हीही कंपनीत म्हणजेच निर्मिती, पारेषण आणि वितरण यांच्या कामात वाढत्या वीजमागणीचा अंदाज घेणे, त्यासाठी नियोजन आणि आर्थिक तरतूद (Budgeting) करणे या बाबी महत्त्वाच्या आहेत. प्रथम नियोजन करून त्यानुसार वीज देण्याची कार्यवाही केली पाहिजे. नियोजन आणि अंमलबजावणी या दोन महत्त्वांच्या घटकांवर कुठल्याही कंपनीचे यश अवलंबून असते. यासाठी आपल्या मत्तांचा भांडवली उपयोग केला पाहिजे. अकार्यक्षमता असल्यास किंवा सध्या चालू असलेले कार्य पुरेसे आहे, असे मानले तर त्यापुढे आपली कामगिरी आणि वित्तीय फलप्राप्ती या दोन्हीमध्ये घसरण होईल.

म्हणून आपल्या सर्व कार्यक्षेत्रात नियोजन आणि अंमलबजावणी यांचे योग्य व्यवस्थापन असले पाहिजे. सर्व कामात नियोजनबध्दता व कार्यवाही योग्य प्रकारे केल्यास त्याच्या एकत्रित परिणामांमुळे कंपनीच्या संपूर्ण कामगिरीत सकारात्मकता दिसून येईल. नियोजन आणि कार्यवाही यानंतर इतर विषयातही आव्हाने आहेत. यंत्रणा अधिक स्वयंचलित (Automation) करणे, नवीन कल्पना विकसित करणे, अंदाज बांधणे व उभारणी करणे, सर्व साधने मिळविणे, संपर्क व्यवस्थापन प्रभावी करणे, नियमने आणि वाणिज्यिक क्षेत्र, कायद्याचे पालन, वित्त व लेखा तसेच मानव संसाधन व्यवस्थापन या सर्व क्षेत्रात आव्हाने आहेत. विजेच्या तिन्हीही क्षेत्रात आव्हाने आहेतच, या आव्हानांचे स्वरूप, त्यांची भूमिका ही गरज आणि महत्त्व यांच्यानुसार बदलू शकते.

आपल्या तिन्हीही कंपन्यांमध्ये (महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरण) कामांत सतत आव्हाने निर्माण होत आहेत. त्यासाठी विशेष ज्ञान व कौशल्ये विकसित करणे आवश्यक आहे. वीज अभियंत्याच्या कौशल्यामध्ये विकासाला वाव आहे. परंतु, त्यांच्यात वैशिष्ट्यपूर्ण ज्ञान व कौशल्याचा अभाव जाणवतो. आपणास वैशिष्ट्यपूर्ण ज्ञानाच्या माहितीसाठी सल्लागार संस्था/बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्यावर अवलंबून राहावे लागते, ते आपल्याला टाळता आले पाहिजे.

फक्त सध्याच्या काळासाठी काम करतो, त्याऐवजी भविष्याचा विचार करून आपण काम केले पाहिजे. पायाभूत क्षेत्रामध्ये कार्यरत आहोत, म्हणून आपण भविष्यासाठी काम करण्याची दृष्टी बाळगली पाहिजे. किंबहूना, तशी सवय लावून घेतली पाहिजे. आपला दृष्टीकोन आणि संवेदनशीलता यात परिपूर्णता आणून त्याचा वापर आपल्या कामात दिसला पाहिजे.

अशा प्रकारे वीज अभियंत्यांची भूमिका आपल्या कंपनीचा व्यवसाय नीट समजावून घेण्याचा असला पाहिजे. त्यात कार्यपध्दती आणि प्रक्रिया यांना पहिले स्थान आहे. त्यानंतर ज्या क्षेत्रात आपणास काम करण्याची संधी दिली आहे, त्यातील वैशिष्ट्यपूर्ण ज्ञान आपण मिळविले पाहिजे. संचलन व सुव्यवस्था, प्रकल्प, स्वयंचलन, अभिकल्प किंवा संकल्प चित्र तयार करणे, अंदाज तयार करणे, उभारणी, साधनांची खरेदी करणे, पुरवठ्याची साखळी, संपर्क व्यवस्थापन, नियमने, वाणिज्य आणि न्यायालयीन कार्यपध्दती, वित्त व लेखा, मानव संसाधन विकास व व्यवस्थापन या सर्व क्षेत्रात सतत काम करणे आणि वैशिष्ट्यपूर्ण ज्ञान मिळविणे या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत.

आज अभियंत्याला आपली भूमिका आणि कर्तव्य यात नेमका काय फरक आहे, हे समजून घेण्याची आवश्यकता आहे. आतापर्यंत आपण आपल्या कर्तव्यावर लक्ष केंद्रित करीत आहोत. पण, आता जग झपाट्याने बदलत आहे. हे लक्षात घेतल्यास, आपली नेमकी भूमिका काय असली पाहिजे, याकडेही लक्ष दिले पाहिजे.

कर्तव्य करणे आवश्यक असते. तर भूमिका (Role) पार पाडताना काय केले पाहिजे, काय करणे अधिक योग्य होईल आणि काय करता येईल, याचा विचार केला जातो म्हणून भूमिकेनुसार वर्तन हे कधीच संपत नाही. त्याचा शेवट नाही. तो एका परिपक्वतेकडे, परिपूर्णतेच्या दिशेने करावयाचा सतत प्रवास आहे. त्याला सुज्ञतेची आणि प्रतिभेची जोड द्यावी लागते,



**दिनेश वाघमारे** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

आणि ते अनुभवातून प्राप्त होते. अनुभवातून आपले ज्ञान उपयोगात आणण्याची संधी मिळते. महापारेषण कंपनीच्या कर्मचारी रचनेच्या प्रमाणकांबाबत (Staffing Norms) मी आपणास सांगू इच्छितो की, त्यात ऑपरेटिंग (प्रवर्तन) आणि देखभाल या दोन्ही संवर्गाचा (केडर) सुरेख संगम करण्यात आलेला आहे. त्यात काम करणाऱ्यांना कामाच्या आणि नोकरीत करिअरमध्ये प्रगती करण्याची समान संधी देण्यात आली आहे. अशा कर्मचारी प्रमाणकांचं प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचे काम अंतिम टप्प्यावर आहे. कंपनीचे व्यवस्थापन पुढे प्रगत मार्गावर जाण्याच्या दृष्टीने पावले उचललेली आहेत. मानव संसाधन प्रशासन विभागास अंतर्गत कार्यपध्दतीची एकात्मिकीकरण करण्यास सांगितले आहे. उदाहरणार्थ सेवा ज्येष्ठता संबंधित बाबींचे एकत्रीकरण केले जाईल. यासाठीची कार्यवाही प्रगतिपथावर आहे. हे काम आता पूर्ण होत आहे, याचे मला समाधान आहे. याचे फळ अभियंत्यांनाच नाही तर आपल्या तांत्रिक कर्मचारी/यंत्रणाचालक (ऑपरेटर) या सर्वांना होणार आहे. यामुळे कामात नैपुण्य येईल व त्याचा लाभ संपूर्ण कंपनीला होईल.

आपला मानव संसाधन विभाग कर्मचारी रचनेची प्रमाणके (Staffing Norms) याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी इतर कार्यालयीन बाबी पार पाडीत आहेत. आपल्या प्रयत्नांची माहिती दिल्यानंतर आणि राष्ट्रउभारणीमध्ये आपण सर्वांनी स्थान मिळविल्याबद्दल व त्यात आपण करीत असलेल्या योगदानाबद्दल मी सर्वांचे अभिनंदन करतो. आपल्या प्रत्येकांकडून आपली भूमिका, जबाबदारी, तसेच कर्तव्ये याविषयी माझ्या खूप अपेक्षा आहेत.

**शुभेच्छांसह..!**

**- दिनेश वाघमारे**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



मुंबई : महाकृषी ऊर्जा अभियानांतर्गत कृषी ऊर्जा पर्वाचा शुभारंभ मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांच्या हस्ते विधानभवनात करण्यात आला. याप्रसंगी उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार, ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, ऊर्जा राज्यमंत्री श्री. प्राजक्त तनपुरे, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. दिनेश वाघमारे, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल आदी.

## ■ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते महाकृषी ऊर्जा पर्वाचा शुभारंभ ■

# शेतकऱ्यांना दिवसा वीज देणे हीच आमची प्राथमिकता : श्री. उध्दव ठाकरे

■ *टीम महावितरण/टीम महापारेषण, मुंबई*

शेतकरी बांधवांना दिवसा आणि पुरेशी वीज देणे शासनाची प्राथमिकता असून महाकृषी ऊर्जा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांनी दिले.

महाकृषी ऊर्जा अभियानांतर्गत कृषी ऊर्जा पर्वाचा शुभारंभ मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांच्या हस्ते विधानभवनात करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार, ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, ऊर्जा राज्यमंत्री श्री. प्राजक्त तनपुरे, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. दिनेश वाघमारे आदी उपस्थित होते.

सर्व देश, राज्य टाळेबंदीत (लॉकडाऊन) होते तरी शेतकरी बांधव मात्र कर्तव्यावर होते, असे सांगून मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे म्हणाले, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बहुतांश कार्यालयीन कामे घरुनच (वर्क फ्रॉम होम) केली जात होती. शेतकऱ्यांनी लॉकडाऊन केले असते तर कठीण परिस्थिती निर्माण झाली असती. इतरांसाठी मळे फुलवणाऱ्या शेतकऱ्यांच्या आयुष्यात काटे येऊ नयेत, यासाठी त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्यामागे सरकार ठामपणे उभे राहील, अशी ग्वाहीदेखील मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी दिली.

मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे म्हणाले, ''जगाचे कामाचे तास सूर्यप्रकाशात असतात आणि शेतकऱ्यांचे मात्र रात्रीचे, कशासाठी? ऊन, वारा, पाऊस अशा सर्व संकटांचा मुकाबला करत तो जगासाठी सोनं पिकवत असतो. त्याच्या आयुष्यात सुखासमाधानाचे क्षण कसे येतील, हे पाहणे सरकारचे काम आहे. 'घोषणांचा पाऊस आणि अंमलबजावणीचा दुष्काळ' असे आम्ही होऊ देणार नाही. शेतकऱ्यांच्या आशीर्वादाची ताकद मोठी असते. ती जेवढी जास्त मिळेल, तेवढा काम करण्याचा हुरुप वाढतो. त्या जोरावर आम्ही शेतकऱ्यांसाठी जे-जे करणे शक्य आहे ते निश्चितच करू.''शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविणे यास आमचे प्राधान्य असून नुकतेच नीती आयोगासोबत झालेल्या दृकश्राव्य बैठकीत पीक विम्याचा प्रश्न उपस्थित केला असल्याचेही मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांनी सांगितले.

**वीजबिलांची थकबाकी भरुन योजनेचा लाभ घ्या : उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार**

उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार म्हणाले, वीजग्राहकांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण करण्यासाठी शासनाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. वीजबिल थकलेल्या सर्व शेतकऱ्यांनी थकित वीजबिलांवर सूट मिळवण्यासाठी नवीन कृषी वीज जोडणी धोरणाअंतर्गत जाहीर केलेल्या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहनही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी यावेळी केले. तसेच शेतकरी, घरगुती वीज ग्राहक आदी सर्वांनाच व्यवस्थित वीज मिळाली पाहिजे, यासाठी सर्वांनी वीजबिले भरणे आवश्यक आहे. वीजगळती होणार नाही याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे, असेही श्री. पवार म्हणाले.

उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार म्हणाले, आम्ही शेतकऱ्यांचे प्रतिनिधी असून शेतकऱ्यांचे प्रश्न, कृषिपंपांचे महत्त्व आम्हाला माहीत आहे. सर्वांना व्यवस्थित वीज मिळेल. वेळेत विजेची जोडणी मिळेल, हे आमचे उद्दिष्ट आहे. ५ वर्षात ५ लाख सौर कृषिपंप देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याच्या अनुषंगाने सौर कृषिपंप योजनेला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण आहे.

ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत म्हणाले, नवीन कृषिपंप वीज जोडणी धोरणांतर्गत १९ फेब्रुवारीपर्यंत १० हजार शेतकऱ्यांना वीजजोडणी देण्याचे उद्दिष्टापेक्षा अधिक काम करत सुमारे १८ हजार शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्यात आली आहे. तसेच १० हजाराहून अधिक सौर कृषिपंप देण्यात आले आहेत. कृषी वाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण अंतर्गत ८४ वाहिन्यांना लघु सौरऊर्जा प्रकल्पातून वीज पुरवली जात असून त्याव्दारे ३० हजारांहून अधिक शेतीपंपांना दिवसा वीजपुरवठा केला जात आहे. या बैठकीत कृषी ऊर्जा पर्वाबाबतचे संगणकीय सादरीकरण महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल यांनी केले. आतापर्यंत सुमारे ४ लाख शेतकऱ्यांनी कृषी वीज बिलांची एकूण ३६४ कोटी रुपयांची थकबाकी भरली आहे. या थकबाकीच्या अनुषंगाने ६६८ कोटी रुपयांची थकबाकी माफ झाली आहे, असे श्री. सिंघल यांनी सांगितले. विजेची संपूर्ण थकबाकी भरुन थकबाकीमुक्त झालेले इगतपुरीचे शेतकरी कचरु धोंडू बोराडे यांना सन्मानपत्र, पालीचे शेतकरी रोशन रुईकर यांना सौर कृषिपंप हस्तांतरण पत्राचे वितरण तर पालघरचे संजय पावडे यांना नवीन कृषिपंप वीजजोडणी प्रमाणपत्र यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते देण्यात आले. तसेच कृषी ऊर्जा पर्व पोस्टर आणि माहिती पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाऊर्जाचे महासंचालक श्री. सुभाष डुंबरे, महावितरणच्या औरंगाबाद प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. नरेश गिते आदी उपस्थित होते.

मी जबाबदार



माझा मास्क. माझी सुरक्षा.

महाराष्ट्र शासन



■ ऊर्जा विभागाला चालना देणारा अर्थसंकल्प : ऊर्जामंत्री ■

# शेतकरी, महिला, युवावर्ग तथा दुर्बल घटकांचा विकास साधणारा अर्थसंकल्प : डॉ. नितीन राऊत

■ टीम महापारेषण, मुंबई

जागतिक महिला दिनी महाविकास आघाडी सरकारने मांडलेला अर्थसंकल्प २०२१ हा महिलांबरोबरच शेतकरी व समाजातील दुर्बल घटकांचा विकास साधणारा असून ऊर्जा विभागाला चालना देणारा असल्याची प्रतिक्रिया राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिली आहे.

राज्याच्या विधिमंडळात सादर केलेल्या अर्थसंकल्पात २०२५ पर्यंत २५ हजार मेगावॅट अपारंपारिक ऊर्जानिर्मितीचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्यापैकी ९ हजार ३०५ मेगावॅट क्षमतेचे अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले असून २ हजार मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प प्रगतिपथावर आहेत. यामुळे रोजगार निर्मितीला व उद्योगांना मोठी चालना मिळणार आहे. कृषिपंपाच्या थकीत वीज बिलात घसघशीत सूट मिळणार असून सौरऊर्जेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवसा ८ तास वीज उपलब्ध होणार आहे. त्यामुळे मी या विकासाभिमुख अर्थसंकल्पाचे स्वागत करतो, असे मनोगत डॉ. नितीन राऊत यांनी व्यक्त केले आहे.

मागील सरकारने कृषिपंप वीज जोडण्याचे धोरण न राबविल्यामुळे लाखो शेतकऱ्यांचे वीज जोडणी अर्ज पैसे भरूनही प्रलंबित होते, अशा शेतकरी अर्जदारांना सौर कृषीपंपाच्या माध्यमातून वीज जोडणी देण्याकरिता कृषीपंप वीजजोडणी धोरण राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. ही योजना राबविण्याकरिता महावितरण कंपनीला दरवर्षी १ हजार ५०० कोटी रुपये निधी भागभांडवलाच्या स्वरुपात देण्याची तरतूद करण्यात आली आहे.




थकीत वीजबिलात शेतकऱ्यांना ३३ टक्के सूट देण्यात आली असून शेतकऱ्यांनी उर्वरित थकबाकीपैकी ५० टक्के रक्कमेचा भरणा मार्च २०२२ पर्यंत केल्यास त्यांना राहिलेल्या ५० टक्के रक्कमेची अतिरिक्त माफी देण्यात येईल. महाविकास आघाडी सरकारच्या वतीने ४४ लाख ३७ हजार शेतकऱ्यांना मूळ थकबाकी रक्कमेच्या जवळपास ६६ टक्के, म्हणजे ३० हजार ४११ कोटी रूपये इतकी रक्कम माफ केली जाणार आहे.

ग्रीन हाऊस गॅसेसचा परिणाम कमी करण्यासाठी तसेच शहरातील प्रदूषणाला आळा घालण्यासाठी ई-व्हेईकलचे धोरण राबविण्यात येत असून राज्यामध्ये नागपूर-मुंबई समृध्दी महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग व मुंबई-नाशिक महामार्गावर मेगा इलेक्ट्रीक व्हेईकल चार्जिंग सेंटर स्थापन करण्यात येणार आहेत. सन २०२१-२०२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता ऊर्जा विभागास तब्बल ९ हजार ४५३ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

जनतेला दर्जेदार आरोग्य व शैक्षणिक सेवा मिळणार आहेत. शहरी भागासोबतच ग्रामीण भागाच्या विकासासाठी हा अर्थसंकल्प महत्त्वाचा आहे. राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी १९८२९ हजार कोटींची भरीव तरतूद करण्यात आली आहे. कोरोनाच्या संकटाचा मुकाबला करीत हा अर्थसंकल्प राज्याचा सर्वसमावेशक विकास घडवून आणेल, असा आशावाद डॉ. नितीन राऊत यांनी व्यक्त केला आहे.

मी जबाबदार



मी जबाबदार



महाराष्ट्र शासन
माझा मास्क. माझी सुरक्षा.



■ ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिली गोपनीयतेची शपथ ■

# 'एमईआरसी'चे अध्यक्ष श्री. संजय कुमार यांनी घेतली पदाची शपथ

■ *टीम महापारेषण, मुंबई*

ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे नवनियुक्त अध्यक्ष श्री. संजय कुमार यांना पदाची तसेच गोपनीयतेची शपथ दिली.

यावेळी राज्याचे मुख्य सचिव श्री. सीताराम कुंटे, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. दिनेश वाघमारे, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे, महाऊर्जाचे अतिरिक्त महासंचालक श्री. सुरज वाघमारे आदी उपस्थित होते.

---

■ महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणूनही कार्यभार सांभाळणार ■

# ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिवपदी श्री. दिनेश वाघमारे यांची नियुक्ती

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे (महापारेषण) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) यांची ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासन येथे प्रधान सचिव म्हणून २९ जानेवारी २०२१ रोजी नियुक्ती झाली. दरम्यान, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणूनही त्यांच्याकडे अतिरिक्त पदभार राहणार आहे.

श्री. दिनेश वाघमारे हे महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून दि. २३ जानेवारी २०२० रोजी रुजू झाले होते. ते १९९४ च्या आयएएस बॅचचे वरिष्ठ सनदी अधिकारी आहेत.

श्री. दिनेश वाघमारे यांना व्यवस्थापन व प्रशासन क्षेत्रातील २७ वर्षांपेक्षा अधिक अनुभव आहे. त्यांनी नागपूरमधील विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेतून (व्हीएनआयटी) बी. ई. (इलेक्ट्रॉनिक्स) या विषयात पदवी संपादन केली आहे. ते आय.आय.टी. खरगपूरचे एम.टेक. (कॉम्प्युटर सायन्स) इंजिनिअर आहेत. इंग्लंडच्या ब्रॅडफोर्ड विद्यापीठातून त्यांनी विकास आणि प्रकल्प नियोजन या विषयातून एम.एस्सी. केले आहे. त्यांना संघबांधणी, प्रकल्प नेतृत्व, प्रशासन आणि व्यवस्थापन या क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव आहे.



मी जबाबदार
मी जबाबदार
मी जबाबदार
मी जबाबदार
महाराष्ट्र शासन
माझा मास्क. माझी सुरक्षा.

**Technology** ■ ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी केले कौतुक ■

# डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरासाठी महापारेषणला सुवर्ण पारितोषिक

■ *टीम महापारेषण, मुंबई*








नवी दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या ७१ व्या ऑनलाईन शिखर संमेलनात स्कॉच पुरस्काराची घोषणा करण्यात आली. यामध्ये 'कार्पोरेट एक्सलन्स' अंतर्गत 'डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर' यासाठी महापारेषणला सुवर्ण पारितोषिकाची घोषणा झाली. महापारेषणच्या स्थित असलेल्या वाहिन्यांच्या मनोऱ्यावर जुनी अर्थवायर काढून ओपीजीडब्ल्यू (ऑप्टिकल ग्राउंड वायर) प्रस्थापित केली आहे. दरम्यान, या पारितोषिकाबद्दल ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत व महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

स्कॉच ग्रुपच्या वतीने दरवर्षी शासन, अर्थ, बँकिंग, तंत्रज्ञान, सांघिक नागरिकत्व, आर्थिक या क्षेत्रातील वाढीसाठी हा पुरस्कार दिला जातो. महापारेषणच्या वतीने नामांकन भरून सदर पुरस्कार गुणांकन पद्धतीने मिळविला आहे.

ओपीजीडब्ल्यू दुहेरी कार्य म्हणजेच अर्थिंग व दूरसंचरणाच्या कामात येते. महापारेषणने सद्यस्थितीत असलेल्या साधनांचा योग्य उपयोग करून उत्पन्नाचा नवीन स्त्रोत साध्य करण्याचा उपक्रम यशस्वीरित्या राबविला आहे. ओपीजीडब्ल्यूचे जाळे ३ हजार कि. मी. लांबीचे, १८५ शहरे, ९९४ ग्रामपंचायती व महाराष्ट्रातील २५ जिल्ह्यांना जोडणारी आहे. या ओपीजीडब्ल्यूमध्ये ८ फायबरचा उपयोग महापारेषणला लागणाऱ्या विद्युत वाहिनी व उपकरणांच्या संरक्षणाकरिता होत आहे. उर्वरित ४० फायबर हे दूरसंचारणकरिता भाडेतत्त्वावर महापारेषणच्या उत्पन्नाकरिता दिले जाते.

या अनुषंगाने महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी सदर उपक्रमाचे वैशिष्ट्ये पाहून स्कॉच पारितोषिकासाठी नामनिर्देशन करण्याचे सुचविले.

सांघिक कार्यालयाच्या एसीआय विभागाच्या दूरसंचारण चमूने या पारितोषिकासाठी नामनिर्देशन करून विविध टप्पे यशस्वीरित्या पार पाडले. महापारेषणच्या चमूने परिक्षकांना उपक्रमाचे फायदे म्हणजेच सद्यस्थितीत असलेल्या साधनांचा योग्य उपयोग, उत्पन्नाचे नवीन स्त्रोत, योग्यरित्या महापारेषणच्या उपक्रमाचे संरक्षण व दूरसंचारणास मदत आदी बाबीं परिक्षकांना पटवून दिल्या. भूमिगत ऑप्टिकल फायबर केबलपेक्षा मनोऱ्यावरील ओपीजीडब्ल्यू ही जास्त सुरक्षित, विश्वसनीय व उपलब्धता असल्याने परिक्षकांनी महापारेषणचे कौतुक केले.

---

**एक कदम स्वच्छता की ओर...** ■ नाशिक महानगरपालिकेच्या स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धेचा निकाल जाहीर ■

# स्वच्छ आस्थापना स्पर्धेत प्रशासकीय इमारत प्रथम

■ *टीम महापारेषण, नाशिक*



महात्मा गांधी जयंतीदिनी 'स्वच्छता के छह साल-बेमिसाल' या राष्ट्रीय उपक्रमांतर्गत यावर्षी नाशिक महानगरपालिकेच्या वतीने सुरू केलेल्या स्वच्छ सर्वेक्षण २०२१ स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये नाशिक परिमंडळीय प्रशासकीय इमारतीस स्वच्छ आस्थापना या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला. त्याबद्दल नाशिक महानगरपालिकेच्या वतीने प्रशस्तीपत्र देऊन महापारेषणला गौरविण्यात आले.

नाशिक महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांमार्फत अचानक देण्यात आलेल्या प्रत्यक्ष भेटींच्या आधारे हे सर्वेक्षण करण्यात आले होते. नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र गायकवाड यांच्या वतीने हे प्रशस्तीपत्र सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. प्रमोद गोडसे यांनी स्वीकारले.

प्रशासकीय इमारतीच्या स्वच्छतेसंबंधित बाह्यस्त्रोत एजन्सीचे योग्य नियंत्रण अति उच्च दाब स्थापत्य बांधकाम तथा सुव्यवस्था मंडळ, नाशिकचे अधीक्षक अभियंता श्री. संदीप हाके, अति उच्च दाब स्थापत्य बांधकाम तथा सुव्यवस्था विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. विनोद ढोरे यांचेकडे असल्याने त्यांचे विशेष कौतुक केले. तसेच सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. प्रमोद गोडसे यांनी स्वच्छतेबाबतची सतर्कता व सहभाग नोंदवून परिमंडळांतर्गत सर्व उपकेंद्रांपर्यंत नेण्याचा मानस व्यक्त केला आहे.



नाशिक महानगरपालिका, नाशिक

स्वच्छ सर्वेक्षण २०२१

उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल प्रशस्तीपत्र २०२०-२०२१

प्रशस्तीपत्र

आस्थापनाचे नाव ........विद्युत पारेषण केंद्र जेलरोड..........

आस्थापनाचा प्रकार ....शासकीय संस्था..... आपण नाशिक महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छ सर्वेक्षण २०२१ अंतर्गत घेण्यात स्वच्छ आस्थापना व स्पर्धेत प्रथम..... क्रमांक मिळविला आहे. त्याबद्दल आपणास हे प्रशस्तीपत्रक प्रदान करून गौरविण्यात येत आहे.

मनोज घोडे पाटील
मुख्य समन्वयक अधिकारी तथा उपायुक्त (प्र)
नाशिक महानगरपालिका, नाशिक

कैलास जाधव (भा.प्र.से.)
आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

**स्वच्छतेचा वसा जपा**

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी नाशिक परिमंडळाचे कौतुक केले आहे. प्रशासकीय परिमंडळीय इमारतीत कार्यरत अधिकाऱ्यांना याप्रसंगी शुभेच्छा दिल्या. तसेच स्वच्छतेचा हा वसा कायमस्वरूपी जपा, अशी सूचना त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना केली.





# एक रात्र सह्याद्रीच्या कुशीत

*१२ ऑक्टोबर २०२० रोजी मुंबईत झालेला विद्युत बिघाड महापारेषणच्या जिगरबाज अधिकाऱ्यांनी कसा दुरुस्त केला, त्यामध्ये आलेल्या अडचणींवर कशी मात केली, सांघिक काम (Team Work) कसे केले. सांगताहेत, आमच्या महापारेषणचे कार्यकारी अभियंता श्री. रविन्द्र नगरे...वाचा त्यांच्याच शब्दांत...*

दि १२ ऑक्टोबर २०२० रोजी सकाळी ९ वाजून ५८ मिनिटाला ४०० के. व्ही. कळवा-पडघा (२) लाईन ट्रीप झाली. कळवा लाईन १ आऊटेजमध्ये होती. ४०० के. व्ही. खारघर उपकेंद्राला स्पार्किंग होऊन तळेगाव-खारघर लाईन हॅन्ड ट्रिप करण्यात आली. परिणामी, ४०० के. व्ही. कळवा व खारघर उपकेंद्राचे पूर्ण Source बंद पडले. सकाळी १० वाजून ४१ मिनिटांनी ४०० के. व्ही. कळवा-पडघा १ लाईन चालू झाली. या लाईनची क्षमता होती ७२४ MW आणि विजेची मागणी होती १२००-१३०० मेगावॅटची. मी स्वतः ४०० के. व्ही. कंट्रोल रुमचा ताबा घेतला. आम्ही दिवसभर व रात्री उशीरापर्यंत विजेची मागणी व पुरवठा यांचे नियोजन करीत होतो. कारण, टाटा पॉवरचे दोन युनिटसुध्दा बंद पडले होते. तेव्हा वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी सर स्वतः हजर राहून सिस्टीमवर नजर ठेवून होते. श्री. भारसाकळे सर (अधीक्षक अभियंता, प्रकल्प मंडळ, कळवा) सोबत मी व इतर अधिकारी आम्ही कळवा-तळेगावच्या Location वर जातो म्हणून कादरी सरांना रात्री सांगितले. कारण ती लाईन ब्रेकडाऊनमध्ये होती.

ठरल्याप्रमाणे, आम्ही १३ ऑक्टोबर २०२० रोजी सकाळी गोंतेवाडी लोणावळा पर्वतरांगेकडे निघालो. दुपारी बारा वाजता Loc No.३३ वर पोहोचलो व तेथून खोल दरीत Bottom Conductor तुटून पडलेला दिसला. आम्ही कॉन्ट्रक्टरसोबत चर्चा करून कामाची रूपरेषा आखली.

दुसऱ्या दिवशी १४ ऑक्टोबर २०२० रोजी सकाळी Loc No.३४ कडे प्रस्थान केले. मी व जितू साबळे वर सह्याद्रीच्या डोंगरावर जाण्यास निघालो. जाताना ओढे, पायवाट, त्याला लागून काही काटेरी झुडपे, कुठे-कुठे तर एका फुटाची पायवाट व दुसऱ्या बाजूस खोलदरी होती. आयुष्यात प्रथमच डोंगरावर एवढ्या अवघड परिस्थितीत उंच पर्वतावर चढत होतो. एका क्षणी तर मला घामच फुटला व पायाखालची जमीन सरकल्याचा भास झाला. त्याचक्षणी मी स्वतःला सावरलं व कुठल्याही परिस्थितीत आपणास मनोरा क्र. ३४ वर जायचं आहे, या ध्येयाने मार्गक्रमण केले. अखेर दुपारी १२ वाजता Loc वर पोहोचलो, त्यावेळी माझा आनंद गगनात मावेनासा झाला. कारण, एक कठीण टप्पा मी पार केला होता. सुमारे दोनशे माणसं काम करीत होती. टॉवर क्र. ३३ व ३४ मध्ये दर १०-१५ मीटरवर माणसे उभी होती. ती माणसे कंडक्टर खराब होऊ नये, म्हणून काळजी घेत होती. दुपारी दोनच्या सुमारास दोनपैकी एक कंडक्टर टॉवर क्र. ३४ वर आला होता. दुसरा कंडक्टर सायंकाळी सहाच्या सुमारास टॉवर क्र. ३४ वर आला होता. मात्र, त्याला आठी पडली होती. इतक्यात, विजेचा कडकडाट सुरू झाला व पाऊस येण्यास सुरुवात झाली. एक वीज आमच्या जवळच कडाडली, सगळे कामगार कंडक्टर व इतर कामे सोडून आमच्या तंबूजवळ आली.

पाऊस सुरू असल्याने रस्ता निसरडा झाला होता. अंधारात पायवाट पूर्णपणे दिसत नव्हती. पुन्हा सकाळी तीन तास पायी चालून डोंगरावर यायचे होते. म्हणून आम्ही (मी, जितू साबळे, प्रशांत मून) लोकेशनवर थांबण्याचा निर्णय घेतला. खायला होती २-३ बिस्किटे, केकचा तुकडा व ब्रेड. प्लॅस्टिकवर साचलेले पावसाचे पाणी, त्यावर आम्ही रात्रीचे जेवण केले. पावसामुळे खाली अंथरलेले प्लॅस्टिक पूर्णपणे ओले झाले होते. त्यामुळे त्यावर बसून उपयोग नव्हता. म्हणून आम्ही जनरेटर बॉक्सवर बसून अक्षरशः रात्र काढली. रात्रभर किडे, फुलपाखरे घोंघावत होती.

सकाळी नऊ वाजता कामगार आले. कंडक्टरचे दोन ठिकाणी व्टिस्ट काढले. साडेदहा वाजता मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी सर लोकेशनवर आले. पहिला कंडक्टर एक वाजता वर गेला. दुसरा दुपारी दोन वाजता क्रॉस आर्मजवळ पोहोचला. क्रिम्पींग करून क्रॉस आर्मला लावण्यात आला.

फक्त स्पेसर व जम्पर मारण्याचे काम बाकी होते. आम्ही परत खाली जाण्यापेक्षा लोकेशन ३३ वर (पुन्हा उंच पहाडावर) जाण्याचा निर्णय घेतला. वर जाण्याचा रस्ता खूपच अवघड होता. दहा-पंधरा मिनिटांनंतर थांबायचो, दगडावर बसायचो असे करत-करत साडेपाचला आम्ही वरच्या टेबल टॉपला पोहोचलो. वर चढत असताना काही ठिकाणांहून खालचे विहंगम, विलोभनीय दृश्य दिसत होते. जणू काही निसर्गाने हिरवा शालू अंथरलेला होता. तिथून चालत आम्ही लोकेशन ३३ ला पोहोचलो. तिथे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडेसाहेब, मुख्य अभियंता श्री. वंदनकुमार मेंढेसाहेब, अधीक्षक अभियंता श्रीमती ज्योती चिमटे मॅडम, श्री. महेश भागवत सर, कार्यकारी अभियंता श्री. किशोर गरूड सर व इतर अधिकारी हजर होते. सव्वासहा वाजता काम पूर्ण होऊन ६ वाजून ५१ मिनिटाला लाईन चालू करून लोड घेतला.

मी ४०० के. व्ही. कळवा-तळेगाव येथे कार्यरत असल्यामुळे Break Down Time कमी करण्यात खारीचा वाटा उचलू शकलो. त्याकरिता सर्वांचे शतशः आभार.

**– श्री. रविन्द्र नगरे**
कार्यकारी अभियंता, अति उच्च दाब विभाग, कळवा

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची निवृत्ती माहे फेब्रुवारी-मार्च २०२१

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. वंदनकुमार दादाराव मेंढे | मुख्य अभियंता | अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, पुणे | २८.०२.२०२१ |

## रयतेचा राजा



■ अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती ■

# छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९१ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

यावेळी सुरूवातीला संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी श्री. अनिल फळणीकर, श्री. सुगत गमरे, श्री. सुधीर वानखेडे, श्री. सतिश जाधव यांनी `शिवरायांचे विचार` याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. संजय कुमार, महाव्यवस्थापक (मा.सं.)(मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**मुंबई :** येथील महापारेषणच्या सांघिक कार्यालयात शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस दीपप्रज्वलन करून अभिवादन करताना महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर.

## मिळून साऱ्याजणी



**पडघे :** येथे जागतिक महिला दिनानिमित्त बोलताना प्रसिध्द निवेदिका श्रीमती दीपाली केळकर. शेजारी सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) डॉ. शितल गेडाम व अन्य महिला अधिकारी, कर्मचारी वर्ग.

■ श्रीमती दीपाली केळकर यांचा **`स्त्रीधन`** कार्यक्रम सादर ■

# वाशी परिमंडळात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

■ *टीम महापारेषण, वाशी*

वाशी परिमंडळातील उदादिधा ग्रहण केंद्र संवसु मंडळ, पडघे येथे व प्रत्येक कार्यालयात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक अंतर राखून व शासनाचे नियम पाळून जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी प्रसिध्द निवेदिका श्रीमती दीपाली केळकर यांचा `स्त्रीधन` हा ओव्या, उखाणे, जात्यावरील गाणे, कविता असा विविधरंगी कार्यक्रम सादर करण्यात आला. याप्रसंगी वाशी परिमंडळातील सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) डॉ. शितल गेडाम यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले. त्यांनी Women आणि Lady यातील फरक तसेच स्वतःमधील नेतृत्वगुण वाढविण्यावर भर देण्याविषयी सांगितले.

या कार्यक्रमात महापारेषण कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांचा जागतिक महिला दिनानिमित्त महापारेषणच्या महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिलेला संदेश व वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी यांनी दिलेल्या संदेशाचे वाचन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अधीक्षक अभियंता श्री. संदीप कलंत्री व कार्यकारी अभियंता श्री. श्रीकांत पेटकर यांनी विशेष प्रयत्न केले.




From the Desk of ED, HR

# सर्वांची सुरक्षा हीच आपली सुरक्षा

कोरोना महामारी मानवतेला मानवधर्म पाळण्यास सांगत आहे. मला वाटतं, कुठेतरी आपण मागे पडलो होतो. मात्र, कोरोना आज आपल्याला शिकवून गेलाय की, आपण मोठेपणाचा उगीच गर्व करू नये. आपला मोठेपणा निसर्गनियमापुढे काहीच नाही. निसर्गाकडे सर्वांना समान करण्याची ताकद आहे. आजघडीला धनसंपत्तीपेक्षाही आरोग्यसंपत्ती महत्त्वाची झालेली आहे. Health is Wealth हे खरं आहे. आज `दौलत सस्ती और जिंदगी महंगी' होताना आपण पाहत आहोत.

कोरोना महामारीने आपल्याला खूप काही शिकवलं आहे. जवळपास एक वर्षापासून आपण जीवनाच्या आनंदापासून वंचित राहिलो आहोत. `जिवंत राहणं म्हणजेच जीवन' अशी जीवनाची नवी व्याख्या झाली आहे.

आपण कोरोनापूर्वीच्या जीवनाला आता शोधत आहोत. त्या ओसंडून वाहणाऱ्या गर्दीला...मुंबईतील लोकल ट्रेनमधील चेंगराचेंगरीला...फलाटाबाहेरचा तो `अनाऊन्सिंग'चा आवाज...फेरीवाल्यांचा गोंगाट... माणसांची दररोजची धावपळ...नको-नकोसं वाटणारं जीवन आता हवंहवंस वाटत आहे. आठवण येते ती त्या गर्दीची, चेंगराचेंगरीची...शहरं कधी थांबणारी नव्हती. आता ती रेंगाळलेली आहेत. शहरांना एक प्रकारची अस्वस्थता, मरगळ आली आहे. सगळेजण सामाजिक अंतराच्या (Social Distancing) नियमाचे पालन करून राहत आहेत.

तोंडाला मास्क लावून तोंड लपविण्यास निसर्ग तर सांगत नाही ना? असा प्रश्न अनाहुतपणे विचारावा वाटतो. मुलांचं शैक्षणिक वर्ष बघता-बघता निघून गेलं. शाळेची मजा ती वेगळीच म्हणा. शिक्षण, खेळ, सहल, गमती-जमतीपासून मुलं दूर झाली. छोट्याशा घरात शाळा `ऑनलाईन' भरते. माझा मुलगा जेव्हा शिक्षकांना आदराने Yes Sir...Yes Madam म्हणतो, तेव्हा आनंदाने ऊर भरून येतो. शिक्षकांचे शिकविण्याचे कसब आणि विद्यार्थ्यांना ज्ञान कसे घेता येईल, याची गोडी यातला आनंद वेगळाच आहे. पण, कोरोनाने विद्यार्थ्यांना बंदिस्त केले आहे. बाहेरचे मैदानी खेळही विद्यार्थ्यांना खेळता येत नाहीत, ही मनातली सल विद्यार्थी पालकांना बोलून दाखवितात.

मला वाटतं, बस्स झालं हे सगळं. आता कुठेतरी हे थांबायला हवं. लवकरच निसर्गच यातून माणसाची सुटका करेल, ही आशा आहे. मानवाला जो धडा शिकवायचा होता, तो निसर्गाने शिकविला आहे. आता निसर्गा, अंत नको पाहू. आम्हाला आमचे पूर्वीचे जीवन (कोरोना महामारीच्या अगोदरचे) परत मिळू दे. ती तुडुंब गर्दी...ती मिरवणूक...तो जोश... जो उत्साह...ती मैफिल...ते मैदानी खेळ...ती मित्रांची साथसंगत पुन्हा लाभू दे. मुलांना शाळेत जाऊ दे. त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ देऊ नकोस. सर्वांचे जीवन एकमेकांवर अवलंबून आहे. माणूस जर एकटा राहिला तर ही जीवनश्रृंखलाच तुटेल, मग अनेकजण भूकबळीने मरतील.

मुळात मानव हा समाजशील प्राणी आहे. समाजाशिवाय तो राहू शकत नाही. त्यामुळे मरणाची भीती नाही पण, जगण्याचा आनंद आहे आम्हाला. जगण्याचं महत्त्व एका कोरोना नावाच्या विषाणूनं आपल्याला एवढं समजावलं, हे आपण मान्य केले पाहिजे. निसर्गाचे रक्षण, त्याचा समतोल, जीवसृष्टीतील प्रत्येकाचा आदर आम्ही चांगल्या प्रकारे नक्की करू. या वसुंधरेचं संवर्धन करू. जीवनात सर्वांचं स्थान टिकवून ठेऊ. जगू व इतरांनाही जगवू. आम्हाला पुन्हा एकदा कोरोनापूर्वीच्या जीवनाची प्रतीक्षा आहे. Let's see.

**शुभेच्छांसह..!**

**- सुगत गमरे**

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**





संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)

E-mail : prohr@mahatransco.in

पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.



The Company accepts no responsibility for the matter published in the journal.